नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - २९ Issue - 29 | वार - मंगळवार दि. २३ जून २०२६ Blow- Tuesday Date 23 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# लखनऊ येथे तीन मजली ईमारतीला भीषण आग; १५ विद्यार्थ्यांचा होरपळून मृत्यू



## मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर; जखमींना ५० हजारांची मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लखनऊ : उत्तर प्रदेशातील लखनौच्या अलिगंजमधील पुरानिया परिसरात आज धक्कादायक घटना घडली आहे. या परिसरातील एक तीन मजली इमारतीला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या इमारतीमध्ये दुसऱ्या मजल्यावर कोचिंग सेंटर होते. त्यामध्ये अनेक विद्यार्थी अडकले होते. मिळालेल्या माहितीनुसार या आगीत १५ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

लखनौमधील आगीतील मृतांचा आकडा वाढला आहे. रुग्णालय प्रशास-नाने दिलेल्या माहितीनुसार या आगीत १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फोनवरून बचाव कार्याची माहिती सातत्याने घेत आहेत. उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी सांगितले की, लखनौमधील आगीत एकूण १५ मुलांचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत. बचावकार्य पूर्ण झाले असून, संपूर्ण सरकार पीडित कुटुंबांच्या पाठीशी उभे आहे. उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. कोणालाही सोडले जाणार नाही आणि कठोर कारवाई केली जाईल. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलीगढमधील आपले सर्व कार्यक्रम रद्द केले असून ते लवकरच घटनास्थळी पोहोचतील.

लखनौमधील आगीच्या घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर केली. जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

ही आग अचानक लागली. ते एक निमेशन केंद्र होते. येथे मुले निमेशन, म्हणजेच कार्टून बनवायला शिकायला येत होती. ही घटना नेमकी कशी झाली, याबद्दल अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. जखमींना केजीएमसी ट्रॉमा सेंटरमध्ये पाठवले जात आहेत. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. या घटनेसंदर्भात उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. प्रधान सचिव (गृह) आणि डीजीपी यांना घटनास्थळी बोलावून, घटनेच्या कारणांची चौकशी करण्याचे आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कठोर कारवाई सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## शेतजमिनीच्या वादातून सख्ख्या भावांनीच भावाला संपवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. शेत जमिनीच्या वादातून एका शेतकऱ्यची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सख्ख्या भावांनी आणि भावांच्या मुलांनींच शेतकऱ्याला संपवलं आहे. संजय नागनाथ शिंदे वय ५५ असं या शेतकऱ्याचे नाव आहे. आज सकाळी शेतात तलवारीने हल्ला करुन त्यांना संपवण्यात आलं. ही घटना कामती खुर्द परिसरात घडली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कामती खुर्द येथील संजय नागनाथ शिंदे (वय ५५) हे आज २२ जून २०२६ रोजी सकाळी दुचाकीने आपल्या शेतात गेले होते. तिथे शेतजमिनीच्या वादातून सख्ख्या भावांनी आणि भावांच्या मुलांनी त्यांच्यावर तलवारीने हल्ला केला. यामध्ये त्यांना जागीच ठार केले, असा आरोप मृताच्या मुलाने केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. मृतदेह ताब्यात घेण्यात आला असून, शवविच्छेदनासाठी सोलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. संजय शिंदे यांच्या पश्चात पत्नी व तीन मुले असा परिवार आहे. या घटनेमुळे परिसरात तणा-वपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

## मान्सूनच्या प्रगतीमुळे राज्यात आनंदाचे वातावरण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बहुप्रतिक्षित मान्सूनने अखेर दोन आठवड्यांच्या विलंबानंतर पुन्हा एकदा महाराष्ट्रात पुढे वाटचाल सुरू केली आहे. आज कोकणातील रत्नागिरी जिल्हा ओलांडून रायगडमधील अलिबागपर्यंत मान्सून पोहोचला. मध्य महाराष्ट्रात सातारा, सोलापूर पार करत तो पुणे जिल्ह्यातील मावळ, मुळशी आणि पुणे शहरापर्यंत दाखल झाला आहे. तसेच दक्षिण अहिल्यानगरमधील श्रीगोंदा, कर्जत, जामखेड भागा-तही त्याची चाहूल लागली आहे. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांचा मोठा भाग मान्सूनच्या प्रभावाखाली आला आहे. विशेष म्हणजे अरबी समुद्र शाखेने तेलंगणातून पुढे सरकत दक्षिण विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्याच्या प्रवेशद्वारापर्यंत मजल मारली आहे. जरी या सर्व भागांमध्ये सर्वत्र पावसाची जोरदार नोंद झाली नसली, तरी मान्सूनी वाऱ्यांनी हजेरी लावली आहे. वातावरण सध्या अनुकूल असून येत्या २-३ दिवसांत मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात मान्सून वेगाने पुढे सरकण्याची शक्यता आहे.

पावसाळ्यात समुद्र सपाटीवरील कमी दाबाचा पट्टा दक्षिणेकडे सरकला असून सध्या तो पंजाब-हरियाणाऐवजी राजस्थान, बिहार आणि उत्तर प्रदेशातून जात आहे. त्याचबरोबर वायव्येकडून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांचा प्रभाव कमी झाला आहे. अरबी समुद्रात सुमारे ३.५ ते ४ किमी उंचीवर असलेली प्रत्यावर्ती वाऱ्यांची प्रणाली कमजोर झाली आहे. त्यामुळे मान्सूनी वाऱ्यांना बळ मिळून महाराष्ट्रात त्यांची प्रगती वेगाने होत आहे. शुक्रवार, २६ जूनपर्यंत विदर्भातील वा-तावरणात उष्णतेची तीव्र लाट तसेच रात्रीच्या उकाडा जाणवेल, अशी माहिती आयएमडी पुणे या संस्थेने दिली आहे. दोन आठवड्यांपासून दक्षिण कोकणातील हर्णे आणि मध्य महाराष्ट्रातील सोला-पूर येथे स्थिर असलेल्या मान्सूनने आज पुणे आणि रायगड जिल्ह्यातील अलिबागपर्यंत वाटचाल केली आहे, अशी माहिती हवामान विभागाने दिली. दरम्यान, मुंबईसह राज्यातील इतर भागात लवकरच मान्सूनची वाटचाल होण्यास हवामान स्थिती अनुकूल आहे, असेही हवामान विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. राज्यात सध्या तुरळक ठिकाणी वादळी पावसाची नोंद होत असली तरी-ही बहुतांश भागात कोरडे हवामान आहे. यंदा तळकोकणात ६ जून रोजी मान्सून दाखल झाला होता. साधारणपणे १५ ते २० जूनच्या आसपास राज्यातील बहुतांशी भागात मान्सून दाखल होतो. मात्र, यंदा जून महिना संपत आला तरीही राज्यात समाधानकारक पाऊस नोंदला गेला नाही. दरम्यान, रविवारपासून हवामानात बदल होत असून मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी हवामान स्थिती अनुकूल आहे.

### ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## उबाठाचे सहा खासदार शिंदे सेनेत दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेनेच्या परिवारामध्ये सहा नवीन खासदार सामील झाले असून त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल, त्यांच्याकडे कधीही दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असा विश्वास एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. या खासदारांच्या विश्वास-ाला तडा कधीही जाऊ देणार नाही, असंही ते म्हणाले. केंद्राशी निगडित प्रश्न असतील वा राज्यातील प्रश्न, कुठेही अडवणूक होणार नाही असा शब्द यावेळी एकनाथ शिंदे यांनी दिला.

ही सगळी ताकद एकत्र आल्यानंतर आ-पली शिवसेना अधिक भक्कम होईल असंही ते म्हणाले. ऑपरेशन टायगर आता फुलप्रूफ सक्सेस झालं आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले. यासंबंधित सर्व कायदेशीर गोष्टी आम्ही केल्या आहेत, असंही शिंदे म्हणाले. ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी यावेळी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

उद्धव ठाकरेंची साथ सोडलेल्या सहा खासदारांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. हे सहा जण खऱ्या शिवसेना परिवारात सामील झाले, याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करतो असं एकनाथ शिंदे म्हणाले.चार वर्षांपूर्वी आपण शिवसेना वाचवण्यासाठी, धनुष्यबाण वाचवण्यासाठी उठाव केला. आता हा लढा दुसऱ्या टप्प्यात पोहोचला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

संजय पाटील हा जनतेशी जोडलेला, ग्राऊंड लेव्हलवर काम करणारा कार्यकर्ता आहे. संजय दिना पाटील हा करा दिनांचा कैवारी असून दोस्ती जपणारा आहे. ओमराजे हे त्यांच्या मनाचे राजे आहेत. पण त्यांनी मनात निश्चय केला आणि ते आपल्यासोबत आले. आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांनी विकासासाठी, न्यायासाठी आपली साथ दिली. काही लोकांनी त्यांना हिणवलं, त्यांना रील स्टार म्हणाले. पण ओमराजे हे रियल स्टार आहेत.

संजय देखमुख हे उत्तम असून त्यांना अधिक उत्तम काम करायचं असल्याने ते आपल्याकडे आहे. नागेश पाटील आष्टीकर हे अत्यंत चांगले आहेत. भाऊसाहेब वाकचौरे हे देखील असेच कार्यकर्ते आहे. हे सर्व खासदार मतदारसंघातील विकासासाठी आपल्याकडे आले आहेत. २०२२ साली बाळासाहेबांची विचारधारा सोडून दुसरा विचार आला त्यावेळी आम्ही उठाव केला. त्यावेळी आपल्यासोबत आलेले ४० आमदार परत निवडून येणार नाहीत असं म्हटलं जायचं. परंतु ४० चे ६० आमदार निवडून आले. चांदा ते बांदापर्यंत शिवसेना मोठी झाली. आमची नीती स्पष्ट होती, विचारधारेला घेऊन आम्ही पुढे गेलो. आता आपल्या या कामात सहा खासदार सामील झाले आहेत. या सहा लोकांची ताकद, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमुळे शिवसेना आणखी बळकट होतील. या खासदारांच्या मतदारसंघातील विकासकामं, त्याच्या अडचणी सोडवण्यात येतील. मी दिलेला शब्द पाळतो, त्यामुळे एकनाथ शिंदेंवर विश्वास ठेवतात.



## संपादकीय....

### आव्हान कायम

पश्चिम आशियातील परिस्थिती सुधारण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा सत्र सुरु झाले आहे, पण या शांतता करारातील संभाव्य अडथळा आणि कमजोर नैऋत्य मान्सूनचा भारताच्या आर्थिक विकास आणि चलनवाढीच्या दृष्टिकोनावर परिणाम होण्याची एकीकडे भीती सतवू लागली आहे, तर दुसरीकडे जागतिक अर्थव्यवस्था नाजूक स्थितीत आहे. या दरम्यान, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या जून महिन्याच्या बुलेटिनमध्ये प्रकाशित 'अर्थव्यवस्थेची स्थिती' या लेखानुसार, नैऋत्य मान्सून अपेक्षेप्रमाणे पडला नाही, तर त्याचा देशाच्या आर्थिक विकास आणि महागाईवर परिणाम होऊ शकतो. भारताची अर्थव्यवस्था सध्या मजबूत स्थितीत आहे, पण कृषी आणि ग्रामीण मागणी मोठ्या प्रमाणावर मान्सूनवर अवलंबून असल्यामुळे कमी पावसामुळे अन्न उत्पादनावर परिणाम होऊ शकतो, परिणामी संभाव्यतः महागाई वाढेल आणि ग्राहकांच्या क्रयशक्तीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक परिस्थिती अद्याप पूर्णपणे स्थिरावलेली नाही. अलीकडेच मध्यपूर्वेत (अमेरिका-इराण करार) शांतता करारामुळे काहीसा दिलासा मिळाला पण, भू-राजकीय तणाव आणि व्यापार-संबंधित अनिश्चितता कायम आहेत. अशा परिस्थतीत, मोठे जागतिक आर्थिक धोके कायम असून विद्यमान करार कमकुवत झाले किंवा तणाव पुन्हा वाढला, तर याचा परिणाम जागतिक बाजार आणि गुंतवणुकीच्या हालचालींवर होऊ शकतो. याशिवाय रिझर्व्ह बँकेने आपल्या अलीकडच्या बुलेटिनमधून वाढत्या जागतिक तणावाचे दूरगामी आर्थिक परिणाम होऊ शकतात. यामुळे महागाईच्या अपेक्षा वाढू शकतात, ऊर्जा पुरवठा पायाभूत सुविधांवर परिणाम होऊ शकतो आणि गुंतवणुकीच्या योजना लांबणीवर पडण्याचा इशारा दिला आहे. सध्याच्या अनिश्चित काळात भारत इतर अनेक देशांपेक्षा अधिक चांगल्या आर्थिक पायावर वाटचाल करत असल्याचे बुलेटिनमध्ये स्पष्ट केले गेले आहे. मजबूत देशांतर्गत मागणी, गुंतवणुकीची गती, नियंत्रित चलनवाढ आणि पुरेसा परकीय चलन साठा देशाची प्रमुख बलस्थाने आहे, पण मान्सून आणि जागतिक परिस्थितीशी संबंधित धोक्यांवर सतत लक्ष ठेवणे महत्त्वाचे ठरेल. अशा स्थितीत, भारताच्या अर्थव्यवस्थेत धक्के पचवण्याची क्षमता असली तरीही दक्षता आणि संतुलित धोरणे तितकीच महत्त्वाची राहील.

# खाजगी सावकारी च्या नावाखाली सर्वसामान्यांची होत असलेली पिळवणूक कधी थांबणार........?

## सर्वसामान्यासह उच्चशिक्षित बेरोजगार तरुण व्यवसायात उतरताच स्मॉल फायनान्स व अवैध सावकारी च्या जाळ्यात..... प्रशासनाची खाजगी सावकारावर कारवाई कधी?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव सारणीकर : औसा तालुक्यातील अनेक गावोगावी तरुण युवक उच्चशिक्षित तरुण शिक्षण घेऊन सरकारी नोकरी व रोजगाराच्या शोधात असतानाच सरकारी नोकरीत संधी मिळत नसल्याने तरुणांना पर्याय नसल्याने कुठेतरी छोटा -मोठा व्यवसाय करून आपली उपजीविका भागवण्यासाठी व्यवसाय करताना बँकेच्या जाचक अटी मुळे त्या तरुणांना आर्थिक मदत मिळत नाही म्हणून खाजगी सावकार व स्मॉल फायनान्सच्या आवाजवी व्याजदराने पैसे घेऊन व्यवसाय सुरू करतात पण व्यवसाय व्यवस्थित चालूनही सावकारी कर्ज फेडताना व्यवसायिकांचा जीव नाकीनऊ येत असल्याने. महिनेवारी व प्रतिदिन व्याजदराणे पैसे काढून व्यवसायिक व्यवसाय करतात त्यात त्यांना सावकारी कर्ज फेडताना अनंत अडचणी येत असतात त्यामुळे त्यांचा व्यवसाय बंद पडतो व सावकाराचं कर्ज डोक्यावर वाढत जात. त्यामुळे कुठेतरी आवाजवि वाढीव दराने पैसे देण हें चुकीचं असतानाही त्या व्यवसायिकांना वारंवार त्रास दिला जातो त्यातूनच आत्महत्या सारखे प्रमाण वाढत चालले असून याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष देणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे. खाजगी सावकार हा अवैध सावकारी रकमेची जाचक वसुली करत वाहणे, शेती, घरे यावर जप्ती आणण्याच कामही अनेक अवैध सावकार करत असल्याच दिसुन येत आहे, अवैध सावकारीचा जाच टाकण्यासाठी प्रशासनाने अवैध सावकारीला आळा घालावा अशी मागणी ग्रामिन भागातुन केली जातेय ग्रामीण भागामध्ये अवैध सावकारीचा वावर वाढत चालला असून, अनेक तरुण या जाळ्यात सापडले आहेत. अवैध सावकारीमुळे कर्जबाजांना मोठ्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असून, त्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम गावोगावी भासतो आहे. ग्रामीण भागांमध्ये रोजगाराच्या कमी संधींमुळे



युवक कजार्साठी सावकारांच्या जाळ्यात येत आहेत.

अवैध सावकाराकडे जाऊन गरजूंना अत्यंत उच्च व्याजदरावर कर्ज दिले जाते, जे परतफेड करणे अशक्य होऊ शकते. त्यामुळे कर्जबाजांच्या गावे सोडण्यापर्यंतची परिस्थिती निर्माण झाली आहे. औसा तालुक्यातील काही गावांमध्ये अशा सावकारीचा आठवड्याला कोट्यवधींचा व्यवहार होत असल्याची माहिती समोर आली आहे, ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीती पसरली आहे, अवैध सावकारीच्या जाळ्यात सापडलेले तरुण मुख्यतः आर्थिक गरजांमुळे अनेक तरुण युवक फसले आहेत. त्यांच्या नोकऱ्यांकरिता पर्याय नसल्यामुळे ते सहज सावकारांच्या जाळ्यात अडकतात. ग्रामिन भागात विशेषतः शेतकरी आणि शेतमजूर या वर्गावर या सावकारीचा विशेष त्रास होत आहे. सावकारी कायद्यात सुधारणा करून या प्रकरणात मिळवण्यास मदत करणे गरजेचे आहे, कारण शेतकरी आर्थिकदृष्ट्या असुरक्षित राहतात आणि त्यांना पुरावा ठेवणे कठीण होते, सरकारने वेगवेगळ्या शेतकऱ्यांसाठी योजनांमुळे आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न केला तरीही सावकारीचा प्रश्न कायमच उभा आहे.

कित्येक गावोगावी चढ्या व्याजदराने गरजुना सावकाराकडुन कर्ज दिले जाते व जाचक अटी लाउन कर्ज वसुली केली जाते, अनेक तरुण व्यवसायीक या अवैध सावकारांच्या अवाढवी व्याजदराने त्रासले असुन अनेकांनी आपले व्यवसाय ही सावकारांच्या तगाद्याने व्यवसाय बंद केल्याच चित्र ग्रामीण भागात आहे. तरुणांना, विद्यालयीन विद्यार्थ्यांना चढ्या भावाने कर्ज देउन त्यांना व्याजापोटी शिक्षन बंद करुन नौकरी करण्याची वेळ ही अवैध सावकारामुळे आली-असुन, ग्रामिन भागातील गाव-ोगावी असणारी अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने विशेश लक्ष घालुन अवैध सावकारीला रोखल पाहिजे असं ग्रामीण भागातील नागरिकांत बोलले जाते.

**प्रश्न कायमच....**

**जिल्ह्यात तालुक्यात व गावोगावी खाजगी सावकारांच्या मनमानी जाचक वसुली व वाढीव व्याज दराने सर्वसामान्याच कंबरडे मोडले असतानाही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने सर्वसामान्यतून नाराजी व्यक्त केली जात आहे.**

**अनेक गावांमध्ये चढया व्याजदराने गरजू शेतकरी व व्यापाऱ्यांना सावकाराकडुन कर्ज मिळते मात्र जाचक अटी लाउन कर्ज वसुली केली जाते.**

**अनेक तरुण व्यवसायीक या अवैध सावकारांच्या अवाढवी व्याजदराने त्रासले विशेषत: शेतकरी आणि शेतमजूर या वर्गावर या सावकारीचा त्रास अधिक प्रमाणात होत आहे.**

**सावकारी कायद्यात सुधारणा करून या प्रकरणात न्याय मिळवण्यास मदत करणे गरजेचे आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजनांमुळे आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न केला तरीही सावकारीचा प्रश्न कायमच उभा आहे.**



# आरोग्यदायी जीवनासाठी योगा आवश्यक : प्रशिक्षक राजेंद्र अनवते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : धकाधकीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ काढला पाहिजे. यामुळे आपण भविष्यात अनेक व्याधीपासून दूर राहू शकतो. शरीराबरोबरच मन निरोगी राहण्यासाठी योगा सातत्याने करणे आवश्यक आहे. योगामुळे आपले मन स्थिर व बुद्धी चंचल रहाते आणि हाती घेतलेल्या कार्यात उत्साह वाढतो. एकूणच आरोग्यदायी जीवनासाठी योगा आवश्यक आहे.' असे प्रतिपादन योग व मार्शल आर्टचे प्रशिक्षक श्री. राजेंद्र अनवते यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना, उन्नत भारत अभियान व स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटच्या भव्य क्रीडांगणावर स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पदविका), स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पदवी), स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसी (पदविका) व स्वेरी लॉ कॉलेज मध्ये बारावा 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी योग व मार्शल आर्टचे प्रशिक्षक राजेंद्र अनवते हे आरोग्यासंबंधी बहुमोल मार्गदर्शन करत होते. समीर बॉम्बेचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ.मिलिंद जोशी म्हणाले की, 'योग साधना आपल्या मनात उतरवली पाहिजे. शरीर मनाला, मन आत्म्याला आणि आत्मा परमात्म्याला जोडण्यासाठी योग आवश्यक आहे.' स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे म्हणाले की, 'देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगाने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून स्विकारला आहे. यामुळे योगाचा सर्वांना फायदा होत आहे. पशु, पक्षी, प्राणी यांच्याकडून सकारात्मकतेने कार्य होताना आपण पाहतो. पण या भूतलावर मानवाकडून नकारात्मकतेकडे अधिक लक्ष जाते. म्हणून नकारात्मक विचारांवर मात करण्यासाठी योग सारखे उत्साहवर्धक उपक्रम सातत्याने राबवावेत. यामुळे मन स्थिर राहते आणि प्रगती झपाट्याने होते. योगामुळे अंतर्मन सुंदर बनते. यासाठी योग व प्राणायम करणे हे खुप महत्वाचे आहे.' यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन, वज्रासन, भुजंगासन, पद्मासन, सुखासन, सूर्यनमस्कार अशी विविध प्रकारची आसने करवून घेतली गेली. यावेळी करकंब मधील विद्यार्थिनी अमृता सरगुले यांनी योगाची विविध प्रात्यक्षिके करून दाखवून उपस्थितांची मने जिंकली. शरीराची कमालीची लवचिकता आणि सहजता या माध्यमातून अमृताने अनेक योग प्रकार सादर केले. यावेळी स्वेरीचे संस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, विद्यालंकार इन्स्टिटयूट, वडाळा, मुंबईच्या प्राचार्या डॉ. संगीता जोशी, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस. मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल चौंडे, उन्नत भारत अभियानचे प्रमुख प्रा. प्रशांत भागानगरे, सर्व समन्वयक, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. नीता तळवलकर यांनी सुत्रसंचालन करून आभार मानले.

**स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या सूचनेनुसार जुलै २०२४ पासून नियमीतपणे प्रत्येक महिन्याच्या २१ तारखेला 'स्वेरी योगा डे' साजरा केला जातो आणि दैनंदिन वेळापत्रकात सकाळी १०:०० ते १०:३० या वेळेत स्वेरीतील सर्व विद्यार्थी व शिक्षकांकडून योगा केला जातो. यावेळी कोलकाता (पश्चिम बंगाल) मध्ये झालेल्या योग कार्यक्रमाचे प्रक्षेपण स्वेरीच्या प्रांगणात मोठ्या एलसीडी च्या माध्यमातून दाखविण्यात आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे योगाचे महत्व व मार्गदर्शनाचा लाभ उपस्थितांनी घेतला.**

**स्वेरीमध्ये बारावा 'जागतिक योग दिन' उत्साहात साजरा**

# ठोस आश्वासनानंतर पुरंदर भूमी अभिलेख कार्यालयासमोरील आंदोलन स्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : पुरंदर : पुरंदर भूमी अभिलेख कार्यालयात वेळेवर नकला न देणे, , दिलेल्या मोजणीच्या दिवशी मोजणीसाठी न जाणे, शेतकऱ्यांनी फोन केल्यास न स्विकारणे, शेतकऱ्यांनी हारकत देण्याचा प्रयत्न केल्यास त्या न स्विकारणे , महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार वेळेत दुरुस्ती न करुन नागरीकांना वेठीस धरणे ,माहिती अधिकार कायद्यांतर्गत दिलेल्या अर्जाचे उत्तर न देणे, अशा प्रकारच्या अनागोंदी कार्यप्रणालीचा विरोधात सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघठन या संघटनेच्या वतीने, भूमी अभिलेख कार्यालय पुरंदर,या कार्यालयासमोर जाहीर निदर्शने आंदोलन आयोजित करण्यात आले होते, परंतु भूमी अभिलेख कार्यालयाच्या उप अधिक्षक स्मिता गौड मॅडम यांनी दिलेल्या ठोस आश्वासनानंतर व सकारात्मक चर्चे नंतर सदरचे आंदोलन स्थगित करण्यात आले,



अशी माहिती. मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघठन या संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णूदादा भोसले, यांनी भूमी अभिलेख कार्यालय पुरंदर येथील गलथान कार्यप्रणालीचा निषेध करण्यासाठी भूमी अभिलेख कार्यालय पुरंदर या कार्यालयासमोर सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता,

परंतु भूमी अभिलेख कार्यालयाच्या उप अधिक्षक स्मिता गौड मॅडम यांनी, आंदोलनाचे निवेदन प्राप्त झाल्यानंतर, तात्काळ लेखी पत्र देऊन, निवेदनात नमुद केलेले विषय सोडविण्यासाठी , शुक्रवार दि. १९ / ६ / २०२६ रोजी आंदोलन कर्ते व प्रशासकीय अधिकारी यांची बैठक भूमी अभिलेख कार्यालय पुरंदर येथे घेतली ,या बैठकीत विषयवार सकारात्मक चर्चा झाल्यानंतर उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय स्मिता गौड यांनी ठोस आश्वासन दिल्यानंतर सोमवार दि. २२ जून रोजी सासवड येथे भूमी अभिलेख कार्यालयासमोर होणारे आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला,

यावेळी प्रशासनाच्या वतीने, भूमी अभिलेख कार्यालयाच्या उप अधिक्षक स्मिता गौड मॅडम, कार्यालयीन अधीक्षक सागर कांबळे, विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, यावेळी उपस्थित होते, तर मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघठन या संघटनेचे प्रदेश अध्यक्ष विष्णूदादा भोसले, जेजुरी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष अविनाश भालेराव, सेवानिवृत्त तालुका कृषी अधिकारी सुनिल जगताप, सेवानिवृत्त सहायक पोलीस निरीक्षक गोविंद जगताप, युवानेते तानाजी भालेराव, रणजित भालेराव, गणपत गायकवाड विष्णू जाधव आदी पदाधिकारी यांनी विविध विषयांवर चर्चा केली, सकारात्मक चर्चेनंतर मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण संघठनेच्या वतीने आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला,

# अंधेरी पूर्वेतील मरोळ-मरोशी रस्त्याच्या कामावर प्रश्नचिन्ह; सुस्थितीत रस्ता पुन्हा खोदल्याचा आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : अंधेरी पूर्व येथील मरोळ-मरोशी हा प्रमुख रस्ता सुस्थितीत असतानाही त्याचे पुन्हा काम हाती घेण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.संबंधित अधिकाऱ्यांनी आणि कंत्राटदारांनी आर्थिक फायद्यासाठी आवश्यक नसताना रस्त्याचे काम सुरू केल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार,रस्त्याची अवस्था समाधानकारक असताना सार्वजनिक निधी खर्च करून नव्याने काम करण्याची गरज नव्हती.तरीही रस्त्याचे खोदकाम व पुनर्बांधणी करण्यात येत असल्याने महापालिकेच्या निधीचा अपव्यय होत असल्याचा सवाल उपस्थित केला जात आहे.या कामामुळे परिसरातील वाहतुकीवरही परिणाम होत असून नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.रस्त्याच्या कामाची आवश्यकता,मंजूर निधी,कामाचे स्वरूप आणि संबंधित कंत्राटदारांची भूमिका याबाबत पारदर्शकता ठेवण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.नागरिकांनी या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून कामाची तांत्रिक गरज होती का,याची माहिती सार्वजनिक करावी तसेच अनावश्यक कामातून निधीचा अपव्यय झाला असल्यास संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर कारवाई करावी,अशी मागणी करण्यात आली आहे.

रस्ता चांगल्या स्थितीत असताना पुन्हा त्याच रस्त्यावर खर्च का केला जात आहे? महापालिकेच्या निधीचा योग्य वापर होत आहे का,याची चौकशी होणे गरजेचे आहे, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत विक्रमी मतांनी विजयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीची आज मतमोजणी सोलापूर येथे सोमवारी करण्यात आली. यामध्ये भाजपचे अधिकृत उमेदवार राजेंद्र राऊत यांना ४८३ तर शरदचंद्रजी पवार गटाचे अधिकृत उमेदवार वसंतदाना देशमुख यांना ११८ मते श्री राजेंद्र राऊत यांनी ३६५ एक वर्षासारखा विजय संपादन केला आहे. या निवडणुकीमध्ये



अदृश्य शक्ती गायब झाली आहे. तरी सत्यादारांना इंग्रजी उमेदवाराला आत्मपरीक्षण करण्याची

मते पडली आहे.

गेल्या दोन महिन्यापासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या

निवडणुकी चालू होती. यामध्ये भाजप कडूनही कोणाला उमेदवारी मिळणार याकडे त्याचे लागून राहिले होते. भाजपने उमेदवारी बाबत सस्पेन्स कायम ठेवला होता. मात्र भाजपने अखेरच्या क्षणी राजेंद्र राऊत यांना सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकृत उमेदवारी जाहीर केली. राष्ट्रवादी शरद पवार गटाची जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांना अधिकृत उमेदवारी

**सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री जयकुमार गोरे यांची सोलापूर जिल्ह्यावर पकड असल्याचे दिसून आले आहे. स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषदेची निवडणूक महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे सूत्रे सोपवली होती. त्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूर जिल्ह्यामध्ये मोर्चेबांनी चांगली केली होती. त्यांनी निवडणुकीमध्ये शरदचंद्र पवार गटाची आमदार उत्तमराव जानकर, आमदार अभिजीत पाटील, आमदार नारायण पाटील, पदाधिकाऱ्यांना बरोबर घेतले होते. त्यामुळे श्री राजेंद्र राऊत यांचा विजय निश्चित मानला जात होता. मतमोजणीनंतर मालक मंत्री जयकुमार गोरे यांची खेळी यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे.**

जाहीर केली. दोघांमध्ये दुरंगी लढत झाली असल्याचे दिसून आले आहे.

सोलापूर जिल्ह्यात भाजप माहितीचे वर्चस्व कायम आहे जिल्ह्यामध्ये भाजपची ताकद वाढत असल्याची दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती नगर परिषद, यामध्ये भाजपला मोठ्या प्रमाणात यश मिळाले असल्याचे दिसून येत आहे. भाजपचे जिल्ह्यामध्ये पाच आमदार होते व राजेंद्र राऊत निवडून आल्यामुळे जिल्ह्यात सहा आमदार झाले आहे. सोलापूर जिल्ह्याची भाजपची ताकद वाढत आहे किंवा अनेक नेते भाजपमध्ये सोलापूर जिल्ह्यामध्ये प्रवेश करत आहे.

# योग करा, निरोगी रहा व आनंदी रहा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विवेकानंद प्रतिष्ठान अक्कलकोट व पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ए-वन चौक येथील विठ्ठल मंदिर परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा ।शत्रुबुद्धिविनाशाय दीपज्योतिर्नमोस्तुते ।।अशा या मंगलमय दीपप्रज्वलनाने आजच्या योग कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी अक्कलकोट नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष ऋतुराज (बंटी) राठोड, नगरसेवक रमेश कापसे, अशोक जाधव, उर्मिला शिंदे, नगरसेविका अपर्णा सिद्धे, मल्लिकार्जुन मसुती, प्रदीप पाटील, दिनेश पटेल, अंदप्पा कळके, योगशिक्षक कस्तुरीताई गुरव, परमेश्वर जकापुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यानंतर २०१५ पासून जगभरात हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे.

ते पुढे म्हणाले की, योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधण्यासाठी योग हा प्रभावी मार्ग असून नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढते, मानसिक ताणतणाव कमी होतो, एकाग्रता सुधारते आणि जीवन अधिक निरोगी व आनंदी बनते. आजच्या धावपळीच्या जीवनात योगाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.

कार्यक्रमात योगशिक्षक परमेश्वर गुरव व माणिक माशाळे यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना योगाचे धडे दिले. यावेळी नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, राजशेखर उंबरणीकर, विजयकुमार पाटील, विलास कोरे, मल्लिकार्जुन आळगी, गुरुपादप्पाआळगी, दयानंद बिडवे, शिवशरण जोजन, राजू हिप्परगी, संजय हारकुड, डॉ. सतीश बिराजदार, वेद मूर्ती बसवराज शास्त्री तीर्थ, गजानन पाटील, डॉ. बसवराज नंदीकोले, राजशेखर हिप्परगी,सत्यजीत लोके, शिवशरण जोजन,मल्लिनाथ मजगे, मलकप्पा भरमशेट्टी, ज्ञानेश्वर शिंदे, सुरेश आवटे, विश्वनाथ नवभागे तसेच मोठ्या संख्येने योगप्रेमी व विवेकानंद प्रतिष्ठान व योग समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वनाथ देवरमनी यांनी केले तर आभार प्रदर्शन चंद्रकांत दसले यांनी मानले.

## कामगार कल्याण केंद्र कळंब येथे योग दिन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी, कामगार कल्याण केंद्र गट कार्यालय लातूर अंतर्गत कळंब केंद्रात आंतरराष्ट्रीय २१ जून योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ह.भ.प. बळीराम महाराज कवडे (वाहक) कळंब बसआगार यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून योगशिक्षिका राजकन्या गवळी ( वाहक) ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ नागरिक महासंघ धाराशिव, ह.भ. प. सुनीता महाराज अडसूळ वारकरी साहित्य परिषद (महिला) जिल्हाध्यक्षा धाराशिव, पत्रकार माधवसिंग राजपूत, कामगार संघटनेचे गणेश भराटे यांची उपस्थिती होती या कार्यक्रमात कळंब येथील प्रसिद्ध योगशिक्षिका राजकन्या गवळी यांनी उपस्थित महिला व पुरुषांना मार्गदर्शन करीत असताना ध्यान योग प्राणायाम याचे महत्त्व विशद केले, तान तनाव परिस्थितीमध्ये ध्यान योग प्राणायाम हाच सर्वोत्तम उपाय आहे असे त्यांनी सांगितले व त्यांनी याविषयी माहिती दिली व प्रत्याक्षी के करून दाखविली, तर ह.भ. प. बळीराम महाराज कवडे यांनी योग ही भारतीय संस्कृतीची देणगी असून त्यांनी महाभारतात भगवान श्रीकृष्णाने योगाच महत्त्व सांगितला आहे.२१ जून या दिवशी फक्त योग प्राणायाम यात सहभाग न घेता वर्षभर आपण योग प्राणायाम करायला हवे निश्चित याचे सकारात्मक परिणाम आपणाला दिसतील असे सांगितले तर माधवसिंग राजपूत यांनी आपल्या मार्गदर्शनात योग मुनी पतंजली यांनी योग प्राणायाम याविषयी संशोधनात्मक कार्य केले व पुढे योग गुरु रामदेव बाबांनी देश व देशाबाहेर असंख्य लोकापर्यंत याचे महत्त्व पोहोंचवीले आहे व आज हे काम असंख्य योगशिक्षक करीत आहेत असे सांगितले या कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केंद्र प्रमुख उमेश जगदाळे , ग्रंथपाल दिनेश गिरी यांनी सूत्रसंचलन महिला सहाय्यक केंद्र संचालिका प्रतिज्ञा वरखेडकर यांनी व आभार अनुजा कुलकर्णी यांनी मानले.

## ओम संतोष भोसले यांचा 'सीईटी' परीक्षेत घवघवीत यश; नागेश फाटे यांच्या हस्ते विशेष सत्कार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री. संतोष भोसले यांचे चिरंजीव ओम संतोष भोसले याने 'एमएचटी-सीईटी' (चक्ध-उएढ) परीक्षेत ९८.८६ पर्सेंटाइल गुण मिळवून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्याच्या या यशाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते ओमचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

ओमने मिळवलेले हे यश अत्यंत कौतुकास्पद असून, त्याने भोसले परिवारासोबतच संपूर्ण परिसराचा गौरव वाढवला आहे, अशा भावना यावेळी सत्कारकर्ते नागेश फाटे यांनी व्यक्त केल्या. तसेच ओमच्या पुढील उच्च शिक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी श्री. भास्कर गायकवाड, डॉक्टर रमेश फाटे, श्री. उमेश फाटे, श्री. शाहू राऊत, श्री. शुभम फाटे आणि श्री. शशांक फाटे आदी मान्यवरांनी उपस्थित राहून चि. ओम याच्या पाठीवर कौतुकाची थाप दिली व त्याला शुभेच्छा दिल्या. या यशामुळे चि. ओम भोसले याच्यावर सर्वच स्तरातून अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## जि. प. प्राथमिक शाळा वागदरी येथे विद्यार्थ्यासह उपस्थित मान्यवरांना दिली व्यसन मुक्तीची शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नळदुर्ग/प्रतिनिधी : परिवर्तन सामाजिक संस्थेचे सचिव तथा महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसन मुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी ता. तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यासह उपस्थित मान्यवरांना दिली व्यसन मुक्तीची शपत.

दि.२०जून २२६ रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले चे धाराशिव जिल्हा सचिव पत्रकार एस के गायकवाड यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वागदरी येथे विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास, अभिष्टचिंतन, मान्यवरांचा सत्कार व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे आणि खाऊचे वाटप अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मारुती बनसोडे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार दैनिक अंबरनाथ टाइम्स च्या वतीने दिला जाणारा अंबरनाथ गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले की विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून आपले उच्च शिक्षण पूर्ण करून निर्व्यसनी राहून आपला सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन करून त्याने उपस्थित विद्यार्थ्यांना व मान्यवरांना व्यसनमुक्तीची शपथ दिली याप्रसंगी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते मार्गदर्शक कैलास गवळी गुरुजी, आर.एस.गायकवाड, आदींचीही शुभेच्छा पर भाषणे झाली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच तथा ग्राम सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार, भाजपा तालुका उपप्रमुख किशोर सुरवसे,माजी उपसरपंच दत्ता सुरवसे भाजपा मीडिया सेलचे तालुका उपप्रमुख किशोर धुमाळ शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महादेव वाघमारे आदी होते.

प्रारंभी स्त्री शिक्षणाच्या अध्यप्रवर्तक क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रिपाइं (आठवले ) चे तालुकाध्यक्ष तथा पत्रकार अरुण लोखंडे यांनी केले तर सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते प्रबोध कांबळे यांनी केले. याप्रसंगी आंबेडकरी चळवळीतील सुरेश लोंढे अरविंद लोखंडे अनिल वाघमारे दीपक वाघमारे चंद्रकांत वाघमारे तात्या वचने अंगणवाडीच्या पद्मिनी ताई पवार, रूपाली जाधव,कोमल झंडारे सहशिक्षिका एस.एस.मसे, सहशिक्षक एन.एन.काळे, डी.बी. अनपट,तानाजी लोहार विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

**निफाड महाविद्यालयाची अभिमानास्पद कामगिरी**

# भारतीय सेना व महाराष्ट्र पोलीस दलात २९ विद्यार्थ्यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपतदादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, निफाडच्या एनसीसी आणि क्रीडा विभागाने आणखी एक उल्लेखनीय यश आपल्या नावे नोंदविले आहे. महाविद्यालयातील तब्बल २९ विद्यार्थ्यांची एकाच वेळी भारतीय सेना आणि महाराष्ट्र पोलीस दलात यशस्वी निवड झाली असून, या यशामुळे संपूर्ण निफाड तालुक्यासह महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी आयोजित विशेष सत्कार समारंभात मविप्र समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, डॉ. डी. टी. ढगे, प्रा. ए. एस. वडघुले आणि प्रा. एस. बी. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय सेनेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आदित्य मत्सागर, शुभम शिंदे, अमोल नागरे, विवेक शिंदे, कृष्णा शेलार, सुरज पगार, रोहन वाघचौरे, कृष्णा वाघ, ओम बोरगुडे, यश खापरे, जागृती बोरगुडे, अक्षय लोखंडे, राहुल गीते, लक्ष्मण पवार, सिद्धेश ढेपले, कृष्णा थोरात आणि शुभम कराड यांचा समावेश आहे.

तर महाराष्ट्र पोलीस दलात वैष्णवी खैरे, प्रियंका गवे, निकिता फडे, श्याम कुटे, अजिंक्य अहिरे, शुभम काळे, विशाल सानप, सोमनाथ निकम, आदिती सोनवणे, मोनाली शेरे, मुस्कान शेख आणि धनश्री क्षीरसागर यांची निवड झाली आहे.

या सर्व विद्यार्थ्यांना प्रा. एस. बी. गायकवाड, प्रा. सी. ए. मोरे आणि प्रा. सी. ए. कुंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमासोबतच महाविद्यालयाने दिलेले प्रशिक्षण, शिस्त, शारीरिक तयारी आणि स्पर्धात्मक वातावरण यामुळे हे यश संपादन करणे शक्य झाल्याचे मान्यवरांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा आणि विद्यार्थ्यांच्या यशाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. एल. कोटकर यांनी केले, तर डॉ. डी. टी. ढगे यांनी आभार प्रदर्शन केले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई भागवत-बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, सर्व सभासद, हितचिंतक, प्राध्यापकवृंद तसेच विद्यार्थ्यांच्या पालक व नातेवाईकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

**शिक्षणाचा खरा उद्देश केवळ पदवी प्रदान करणे नसून विद्यार्थ्यांना स्वावलंबी, सक्षम आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे हा आहे. विद्यार्थ्यांच्या यशातून त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावते, तेव्हाच शिक्षणाचा हेतू पूर्णत्वास जातो. निफाड महाविद्यालय गेली अनेक दशके शिक्षण, संस्कार, क्रीडा, समाजभान, पर्यावरण जनजागृती आणि रोजगाराभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडवत आहे. मविप्रच्या कर्मवीरांच्या विचारांवर उभ्या असलेल्या या संस्थेच्या कार्याचा हा आणखी एक गौरवशाली टप्पा आहे. भारतीय सेना आणि महाराष्ट्र पोलीस दलात २९ विद्यार्थ्यांची निवड ही केवळ महाविद्यालयाची नव्हे, तर संपूर्ण निफाड परिसराची अभिमानास्पद उपलब्धी आहे. या यशामागे विद्यार्थ्यांचे परिश्रम, पालकांचे पाठबळ आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा.**

**– बाळासाहेब क्षीरसागर, सभापती, मविप्र समाज संस्था**

## उगाव शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्था, निमगाव जाळी संचलित छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव* येथे २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी यांनी विद्यार्थ्यांनी नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य चांगले राहते तसेच एकाग्रता, आत्मविश्वास व सकारात्मकता वाढीस लागते, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

विद्यालयाचे क्रीडाशिक्षक भालचंद्र सूर्यवंशी व तांबोळी यांनी विविध योगासने व प्राणायामाची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यांनी विद्यार्थ्यांकडूनही विविध योगासने करून घेत योगाचे महत्त्व समजावून सांगितले.

या कार्यक्रमास पर्यवेक्षक नंदाराम ढिकले, सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सर्वांनी विद्यार्थ्यांसमवेत योगासने करून योग दिनाचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

संपूर्ण परिसर योगमय वातावरणाने भारावून गेले होते.

# पत्रकारिता आव्हानात्मक क्षेत्र, परस्परांना बळ देणे गरजेचे : आ. सचिन कल्याणशेट्टी

## श्रमिक पत्रकार संघातर्फे शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर श्रमिक पत्रकार संघाने केवळ पत्रकारांचे प्रश्न मांडण्यापुरते काम मर्यादित ठेवले नाही. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, पत्रकारांसाठी मेडिक्लेम योजना आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून संघटनेने आदर्श निर्माण केला आहे. पत्रकारिता हे आव्हानात्मक क्षेत्र असून, पत्रकारांनी एकत्र येऊन परस्परांना बळ देणे गरजेचे आहे. शालेय साहित्य वाटप हा केवळ उपक्रम नसून पत्रकार कुटुंबांना एकत्र आणणारा आणि संघटनेविषयी आत्मीयता निर्माण करणारा उपक्रम आहे, असे गौरोद्गार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी काढले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल, डॉ. शैलेशकुमार पाटील फाउंडेशन, शहाजीराजे पवार युवा मंच आणि राजदीप (एचपी) गॅस एजन्सी यांच्या सहकार्याने आयोजित पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्य वाटप समारंभात आमदार कल्याणशेट्टी बोलत होते. याप्रसंगी भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, डॉ. शैलेशकुमार पाटील फाउंडेशनचे व्हाईस प्रेसिडेंट जगदीश पाटील यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी विचारमंचावर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत, दैनिक दिव्य मराठीचे संपादक महेश रामदासी, दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, दैनिक तरुण भारत संवादचे निवासी संपादक विजयकुमार देशपांडे, दैनिक जनसत्यचे संपादक सरदार अत्तार, दैनिक सकाळचे वृत्त संपादक वैभव गाढवे, न्यूज प्लस चॅनलचे संचालक तात्यासाहेब पवार , श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्कृतमधील 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या उक्तीचा उल्लेख करत आ. कल्याणशेट्टी पुढे म्हणाले की, समान विचार आणि समान ध्येय असलेली माणसे एकत्र आली, तर त्यातून मजबूत संघटना निर्माण होते. अडचणींवर मात करता येते. प्रत्येक क्षेत्रात संघर्ष आहे. राजकारण असो, पत्रकारिता असो, वैद्यकीय क्षेत्र असो किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो, प्रत्येकाच्या वाट्याला काही ना काही अडचणी येतात. एकजुटीतून त्या सोडवता येतात. सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत त्यांनी संघाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



याप्रसंगी शहाजी पवार म्हणाले, कोणतीही दुर्घटना घडो, भूकंप असो, पूरस्थिती असो, पंढरपूरची वारी असो किंवा सिद्धरामेश्वर यात्रेसारखे धार्मिक सोहळे असोत, लोकप्रतिनिधी पोहोचण्यापूर्वी घटनास्थळी पत्रकार उपस्थित असतात. पत्रकार सुखातही सोबत असतो आणि दुःखातही. समाजातील प्रत्येक घडामोड नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकार प्रामाणिकपणे करतात. समाजातील सर्वसामान्य माणसाला आजही पत्रकारांवर विश्वास आहे. पत्रकारांनी एखादा प्रश्न उचलून धरला, तर न्याय मिळेल, अशी भावना समाजामध्ये आहे. त्यामुळे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी अधिक महत्त्वाची असून पत्रकार होणे हे पुढारी होण्यापेक्षाही कठीण काम आहे.

प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर खजिनदार किरण बनसोडे यांनी आभार मानले. यावेळी वृत्तपत्र, वृत्तवाहिनी यांचे पत्रकार तसेच पाल्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भीमा नदीच्या वीज पुरवठा आठ तास वीर बोरवेल कृषी पंपाचा दहा तास करावा या मागणीसाठी सोलापूर येथे जिल्हाधिकार्यालयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आक्रोश मोर्चा काढण्यात आला.




सोलापूर जिल्हा सध्या भीमा नदीकाठच्या शेती पंपाला वीज पुरवठा फक्त दोन तास केला जात आहे. व इतर पंपासाठी सहा तास वीज पुरवठा केला जात आहे. उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी तळहातावर खोडाप्रमाणे आपली पिके जपलेले असतात ती पिके आता पावसाळ्याच्या तोंडावर विजे अभावी करपू लागलेली आहे आपण जो भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना वीज पुरवठा दोन तास करत आहे. तू तात्काळ आदेश रद्द करून शेतकऱ्यांना आठ तास भीमा नदीकाठच्या शेतकऱ्यांना आठ तास वीज पुरवठा सुरळीत करावा यासाठी सोलापूर जिल्ह्यामध्ये बोरवेल, पंपासाठी वीज पुरवठा दहा तास करावा अशी ही मागणी या निवेदनात केलेली आहे. उजनी दरातून शेतकऱ्यांना भीमा नदीत अजून एक पाळी सोडावी अशी मागणी होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील थकीत उजविले तात्काळ जमा करावीत , भीमा नदीवरील बॅरिगेट बंधारे ठिकठिकाणी उभे करावेत.

शेतकऱ्यांचा कर्जमाफी अटी व शर्ती रद्द करून सरसकट शेतकऱ्यांना कर्जमाफी करावी.

नको असलेला शक्तिपीठ महामार्ग तात्काळ रद्द करावा.


ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा वीज पुरवठा करणारा ट्रान्सफर(डीपी) जळल्यास तात्काळ २४ तासात मधून मिळावे.

विजेचे पोल पडून, तारा, कुठून होणारे शेतकऱ्यांची झालेली नुकसान कोण पडल्यावर, उठल्यावर विद्युत पुरवठा बंद होऊन, होणारी नुकसानीचे महावितरण कडून तात्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे.

# निफाडच्या ग्रामदैवत सटूआई माता मंदिराच्या जीर्णोद्धार व भव्य कलशारोहण सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील कादवा नदीकाठी, नक्षत्र वन परिसरात व वैनतेय विद्यालयाच्या मागील बाजूस असलेले ग्रामदैवत मानल्या जाणाऱ्या प्राचीन श्री सटूआई माता. मंदिरात भव्य कलशारोहण व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक उत्सवामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



या निमित्ताने रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता श्री सटूआई माता मूर्ती व कलशाची भव्य ग्रामप्रदक्षिणा काढण्यात आली असून सकाळी ११ वाजता दुर्गा सप्तशती पठणाचा कार्यक्रम झाला .

सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी विविध धार्मिक विधींसह श्री सटूआई माता मूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा उत्सवानिमित्त आचार्य . राहुल कुलकर्णी व नाशिक येथील ब्रह्मवृंद यांच्या वेदघोषात गणेश पूजन, देवप्रतिष्ठा, होम-हवन, पूजाविधी तसेच कलश मिरवणूक आदी धार्मिक कार्यक्रम पार पडले,

यावेळी ह.भ.प. सुजितजी महाराज देवरगावकर यांच्या शुभहस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली तर महंत गणेशगिरीजी महाराज (निफाड) तसेच गुरुमाऊली श्री महंत दिगंबरगिरीजी महाराज (अण्णाबाबा) यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न झाला

याच दिवशी सायंकाळी ५ ते रात्री ८ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते निफाड व परिसरातील हजारो भाविक या धार्मिक सोहळ्यात सहभागी झाले होते,

सटूआई माता मंदिर हे निफाडकरांचे श्रद्धास्थान असून मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे.. सटूआई मातेच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती, आरोग्य व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली,

या पवित्र व ऐतिहासिक धार्मिक सोहळ्यात निफाड शहर व परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने श्री सटूआई मातेचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने सुभाष कर्डीले यांनी केले आहे.

# नियमित योगासने करा... जीवन बळकट समृद्ध करा... जागतिक योग दिन साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरामुर्री येथे आज (दि.२१) सकाळी ०६.०० वाजता सामुहिक जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी योगासने, पसायदान, ओंकार, सूर्यनमस्कार आदी शासकीय कार्यक्रम वेळापत्रकानुसार करण्यात आले.

**छायाचित्र मुन्नाभाई नंदागवळी गोंदिया**

# ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या शासन दरबारी मांडून सोडवणार : आ. डॉ. बाबासाहेब देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : समर्थ यश नागरिक संघ, सांगोला तालुका ज्येष्ठ नागरिकांच्या वतीने विविध प्रलंबित प्रश्न व मागण्यांसंदर्भात सांगोला तालुक्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांना निवेदन देण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली.



निवेदनामध्ये महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांसाठी लागू असलेल्या शासकीय सवलती व कल्याणकारी योजना सध्या लागू असलेल्या ६५ वर्षांच्या वयोमर्यादेऐवजी ६० वर्षांपासून लागू कराव्यात, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना दरमहा किमान तीन हजार रुपये मानधन स्वरूपात आर्थिक मदत देण्याची मागणीही करण्यात आली.

याशिवाय ज्येष्ठ नागरिकांसाठी स्थापन करण्यात आलेल्या आर्थिक महामंडळावर ५० टक्के प्रतिनिधित्व ज्येष्ठ नागरिकांना सभासद म्हणून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. रेल्वे प्रवासात महिलांना ५० टक्के व पुरुषांना ४० टक्के मिळणारी सवलत कोविड काळात बंद करण्यात आली असून ती पुन्हा सुरू करावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली.

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नांना विधिमंडळात प्रभावीपणे आवाज मिळावा यासाठी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे दोन प्रतिनिधी विधानपरिषदेत सदस्य म्हणून नियुक्त करावेत, अशी मागणी करण्यात आली. तसेच तेलंगणा राज्यातील कर्मचारी उत्तरदायित्व व पालक आधार देखरेख विधेयक २०२०च्या धर्तीवर महाराष्ट्रात कायदा करावा आणि केरळप्रमाणे स्वतंत्र ज्येष्ठ नागरिक आयुक्तालय सुरू करावे, अशीही मागणी करण्यात आली.

यावेळी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष नवनाथ पवार, कार्याध्यक्ष अरुण वाघमोडे गुरुजी, सचिव वसंत बजरंग दिघे गुरुजी तसेच नुकतेच सेवानिवृत्त झालेले प्रशासन अधिकारी विष्णू चव्हाण गुरुजी उपस्थित होते.

यावेळी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी निवेदन स्वीकारून ज्येष्ठ नागरिकांच्या मागण्या येत्या अधिवेशनात मांडून त्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

**पर्यावरण विषयक जनसुनावणीत हरकतींचा पाऊस**

**आक्षेप नोंदवत प्रकल्प रद्द करण्याची केली मागणी**

# आतकोली डम्पिंग प्रकल्पाला जाहीर विरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : ठाणे शहरातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील आतकोली गावाच्या हद्दीत प्रस्तावित करण्यात आलेल्या ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन (डम्पिंग) प्रकल्पाविरोधात स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने आयोजित पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीत ग्रामस्थ, ग्रामपंचायती आणि डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समितीने मोठ्या प्रमाणावर हरकती व आक्षेप नोंदवत प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय, भिवंडी यांच्या मार्फत भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार ही जनसुनावणी शुक्रवारी (दि. १९ जून) सावद येथील केयूडी बिझनेस क्लस्टरमध्ये उपजिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या सुनावणीत आतकोलीसह परिसरातील विविध ग्राम पंचायतींचे प्रतिनिधी, शेतकरी, नागरिक आणि डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ठाणे महानगरपालिकेच्या प्रस्तावित समन्वित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला विरोध दर्शवत लेखी हरकती, तक्रारी आणि आक्षेप नोंदविण्यात आले.



डम्पिंग विरोधी स्थानिक पंचक्रोशी संघर्ष समितीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तब्बल १५ मुद्द्यांवर आधारित सविस्तर हरकत सादर केली. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एख) अहवालातील अनेक बाबी दिशाभूल करणाऱ्या व अपुऱ्या असल्याचा आरोप समितीने केला. या अहवालाचा वैज्ञानिक आणि तांत्रिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण तज्ज्ञाची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासाठी पर्यावरण तज्ज्ञ डॉ. स्नेहल दोंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अहवालाची पडताळणी व प्रकल्प स्थळाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार असल्याचे समितीने स्पष्ट केले. समितीने याप्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून ती सध्या प्रलंबित असल्याने न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत प्रकल्पास कोणतीही पर्यावरणीय परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्र देऊ नये, अशी मागणीही करण्यात आली.

प्रकल्पामुळे भविष्यात पाणी, हवा आणि ध्वनी प्रदूषण वाढून स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. तसेच शेती, उद्योगधंदे आणि परिसराच्या विकासावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याचे नागरिकांनी सुनावणीत नमूद केले. त्यामुळे हा प्रकल्प जनहिताच्या दृष्टीने तात्काळ रद्द करावा, अशी मागणी संघर्ष समितीने केंद्र व राज्य शासनाकडे केली आहे.



सुनावणीदरम्यान संघर्ष समितीचे कायदेशीर सल्लागार ड. संदीप जाधव यांनी ठाणे महानगरपालिकेने सादर केलेल्या पर्यावरणीय अहवालातील कथित त्रुटी, विसंगती आणि दिशाभूल करणाऱ्या माहितीची सविस्तर मांडणी केली. गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याची माहिती देत त्यांनी प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी केली. यावेळी रमेश शेलार, डॉ. शाम पाटील, भगवान सांबरे, भास्कर माळी, प्रदीप भोईर, कपिल ढमणे, राम दळवी, विनोद शेलार, संदीप शेलार, ड. बलवंत जोशी आदींनीही आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

जनसुनावणीनंतर संघर्ष समितीने प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन प्रशासनाला सादर केले. यावेळी प्रकाश भोईर, महेश राऊत, विजय भोईर, पंकज भोईर, नितीन शेलार, प्रदीप सपाट, दिनेश भोईर, राजाराम शेलार, बारकू राऊत, रुपेश राऊत, जगदीश राऊत, अरुण मंजे, हरेश राऊत, रमेश भालेकर, महेश भोईर, रघुनाथ पाटील, अजय चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. दरम्यान, भादाणे, तळवली-अर्जुनली, पिसे-चिराडपाडा, आमणे, किरवली, कुरुंद, पडघा, डोहोळे आणि राहूर या ग्रामपंचायतींनीही प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाविरोधात कायदेशीर हरकती नोंदविल्या असून स्थानिकांचा विरोध दिवसेंदिवस तीव्र होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.